**श्री. नितीनकुमार हिंगोले, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, यांचे कार्यालय, पुसद**

क्रमांक/राजस्व-3/भु.सं.-2/कावि/ 582/2017 दिनांक 14 जुन 2017

**भुसंपादन प्रकरण क्रमाक- 24/47/2015-16 मौजा वसंतपुर खर्डा ता. दिग्रस जिल्हा यवतमाळ**

# अधिसुचना

**भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भुमीसंपादन, पुर्नवसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013(2013 चा 30) (यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम-11 च्या पोट कलम-(1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसुचना, क्रमांक/ 269 दिनांक 31/03/2017 अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विर्नीदीष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी कलम-15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम-19 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीमध्ये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याआर्थी, अनुसुची तिन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबीयांच्या पुर्नवसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुर्नवसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुर्नवसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विर्नीदीष्ट केला आहे.

आणी ज्याआर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासनं असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्याची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी पुसद जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची एक
## संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन

गाव वसंतपुर खर्डा तालुका दिग्रस जिल्हा यवतमाळ

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 75 | 0.04 |
| 2 | 76/1 | 0.46 |
| 3 | 75/1अ | 0.29 |
| 4 | 53/1 | 0.25 |
| 5 | 53/2 | 0.28 |
| | **एकुण** | 1.32 |

2...

Scanned by CamScanner

## अनुसूची- दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपात विवरण

**अधिसुचना निर्गमित करण्यापुर्वी**

**प्रकल्पाचे नाव:-** वर्धा-यवतमाळ-नांदेड नविन रेल्वे लाईन प्रकल्प

**प्रकल्प कार्यालयाचे वर्णन -** वर्धा-यवतमाळ-नांदेड नविन रेल्वे लाईनचे सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ

**समाजाला मिळणारे लाभ -** पायाभुत सोई-दळणवळण मार्गाची निर्मीती होवुन वस्तु, व्यक्तीची वेगवान वाहतुक शक्य होवुन आर्थीक विकासाला चालना मिळेल.

## अनुसूची -तिन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नाव वसंतपुर खर्डा तालुका दिग्रस जिल्हा यवतमाळ

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| | **नि रं क** | |

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

नि रं क

टिप :- उक्त जमीनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद जिल्हा यवतमाळ यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

दिनांक :-

ठिकाण :-

(नितीनकुमार हिंगोले)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, पुसद
जिल्हा यवतमाळ

(सचिंद्र प्रताप सिंह)
जिल्हाधिकारी, यवतमाळ

Scanned by CamScanner